कीडनियंत्रण

# टोमॅटोवरील फळे पोखरणाऱ्या अळीचा बंदोबस्त



**राहुल साळवे**
(मो.नं. ९१६८४९७८८३)
**डॉ. पुरुषोत्तम नेहरकर**
कृषी कीटकशास्त्र विभाग,
वसंतराव नाईक मराठवाडा
कृषी विद्यापीठ, परभणी

टोमॅटोवरील फळे पोखरणाऱ्या अळीचे शास्त्रीय नाव 'हेलिकोव्हार्पा अर्मिजेरा' (Helicoverpa Armigera) असे आहे.

**यजमान पिके** : ही बहुभक्षी कीड असून, १८१ पेक्षा जास्त वनस्पतींवर उपजीविका करते. त्यात टोमॅटो, मिरची, भेंडी, कोबीवर्गीय पिके, घेवडा, वाल, वाटाणा अशा अनेक पिकांचा समावेश आहे.

**जीवनक्रम व ओळख** : या किडीचा पतंग फिक्कट पिवळसर असतो. प्रौढ मादी पानाचे देठ, कळ्या व फुलांवर एकेक या प्रमाणे ३०० ते ५०० अंडी देते.

* अंडी गोलाकार हिरवट पिवळी असतात. या अंड्यातून ५ ते ७ दिवसांनंतर अळी बाहेर पडते. अळीची पूर्ण वाढ होण्यास १४ ते १५ दिवसांचा कालावधी लागतो. अळी हिरवट रंगाची असून, शरीरावर तुटक अशा गर्द करड्या रेषा असतात. पूर्ण वाढ झालेली अळी ३० ते ५० मि.मी. लांब असते. * अळी जमिनीत झाडाच्या अवतीभवती वेष्टणात कोषावस्थेत जाते. कोष अवस्था एक आठवड्यापासून ते महिनाभर असते. एक पिढी २५ ते ५२ दिवसांत पूर्ण होते.

**नुकसानीचा प्रकार** : अळी सुरुवातीला कोवळी पाने खाते व कोवळ्या वाढणाऱ्या फांद्या कुरतडून खाते. फळे लागल्यानंतर अळी फळांना छिद्र पाडून आत डोके खुपसून आतील भाग खाते. ही कीड पिकाचे सुमारे ७० ते ८० टक्के नुकसान करू शकते.

**एकात्मिक नियंत्रण**

* कोळपणी व निंदणी करून शेत तणविरहित ठेवावे. * प्रादुर्भावग्रस्त फळे तोडून नष्ट करावीत. मोठ्या अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. * पक्ष्यांना बसण्यासाठी शेतात प्रतिएकरी ८ ते १० थांबे उभारावेत. * सर्वेक्षणासाठी शेतात हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. त्यात हेलिल्यूर गंधाचा वापर करावा.

**जैविक नियंत्रणासाठी**

* लागवडीनंतर ४०-४५ दिवसांनी शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस हे मित्रकीटक १.५ लाख अंडी प्रतिहेक्टर या प्रमाणात ७ दिवसांच्या अंतराने ५ ते ६ वेळा सोडावेत. हे कीटक फळे पोखरणाऱ्या किडींची अंडी शोधून त्यात स्वतःची अंडी घालतात. परिणामी फळे पोखरणारी कीड अंडी अवस्थेतच नष्ट होते. * घाटे अळी लहान अवस्थेत असताना एच.ए.एन.पी.व्ही. (५०० एल.ई.) विषाणूची प्रतिहेक्टरी फवारणी करावी. ५०० मि.लि. प्रति ५०० लिटर पाणी व त्यात ५०० मि.लि. चिकट द्रव (स्टिकर) आणि नीळ २०० ग्रॅम असे प्रमाण असावे. * निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा कडुनिंब आधारित अॅझाडिरेक्टिन (३००० पी.पी.एम.) २ मि.लि. प्रतिलिटरप्रमाणे फवारणी करावी. * बिव्हेरिया बॅसियाना (१ टक्का विद्राव्य पावडर) ६ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यातून फवारावी. * बी.टी. जिवाणुजन्य कीटकनाशकाची फवारणी २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात करावी.

रासायनिक नियंत्रण किडीने आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास याप्रमाणे करावे-

**फवारणीचे प्रमाण (प्रतिलिटर पाणी)**

क्विनॉलफॉस (२५ ई.सी.) २ मि.लि. किंवा क्लोरेन्ट्रानिलिप्रोल (१८.५ एस.सी.) ०.३ मि.लि. किंवा सायन्ट्रानिलिप्रोल (१०.२६ ओ.डी.) १.८ मि.लि. किंवा फ्लुबेंडामाइड (२० डब्ल्यू.जी.) ०.५ ग्रॅम किंवा इंडोक्झाकार्ब (१४.५ एस.सी.) ०.८ मि.लि.

**(टीप** : वरील कीटकनाशकांचे प्रमाण नॅपसॅक पंपासाठी आहे. फवारणीसाठी शुद्ध पाणी वापरावे. कीटकनाशकांचे द्रावण तयार करताना व फवारणी करताना संरक्षणात्मक उपकरणांचा वापर करावा.) ■